# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

### अपर आयुक्त
### आदिवासी विकास नागपुर

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर कार्यालय, आदिवासी विकास भवन, पहिला मजला,

गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर, पीन कोड-440010

**ई-मेल: cafonagpur@gmail.com**

**दुरध्वनीक्र.** 0712-2560127/2560314

# शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांकरीता सन 2026-27 या वर्षाकरीता भाजीपाला पुरवठा करणेबाबत

## (वर्धा प्रकल्प- शा.आ.शाळा हिरापुर (तळणी) )

## (ई-निविदा सन 2026-27 करीता)

**ई-निविदा क्रमांक** 017/ **ATC NAGPUR/VEGETABLE/ PO WARDHA-GAS HIRAPUR**

## निविदेचीमाहिती

| | |
|---|---|
| ई-निविदा क्रमांक | 017/ ATC NAGPUR/VEGETABLE/ PO WARDHA- GAS HIRAPUR |
| ई-निविदा वर्ष | सन 2026-27 करीता |
| ई-निविदा सुचना | अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपुर अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प वर्धा जि- वर्धा अधीनस्त शासकीय आश्रमशाळा हिरापुर (तळणी) ता.देवळी जि- वर्धा येथे भाजीपाला पुरवठा करणे. |
| ई-निविदा सुचना दिनांक | दि. 08/05/2026 |
| विभाग | आदिवासी विकास विभाग |
| कार्यालयाचा पत्ता | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर कार्यालय, आदिवासी विकास भवन, पहिला मजला,गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर, पीन कोड-440010 |
| कार्यालय प्रमुख | श्रीमती आयुषी सिंह, भा.प्र.से. |
| पदनाम | अपर आयुक्त आदिवासी विकास,नागपुर |
| ई-निविदा फॉर्म किंमत रुपये | रुपये 4000 /- (ना-परतावा) |

### निविदा सुचना

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात भाजीपाला खरेदी करुन पुरविण्याकरीता अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपुर हे मुळ उत्पादक किंवा त्यांचे प्राधिकृत वितरक, अधिकृत पुरवठाधारक, निविदाधारक व्यक्ती/ फर्म/ प्रोप्रायटर/ बचत गट/ सहकारी संस्था यांचेकडून भोजन खरेदीसाठी ई-निविदा मागवीत आहेत. ई-निविदापत्र दोन लिफाफा पध्दतीनुसार (टू-बिड) स्विकारण्यात येतील.ई-निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **ई-निविदा तपशिल** | **विहीत स्पेशिफिकेशन** | **अंदाजित खर्चाची रक्कम रुपयात** | **ई-निविदा फॉर्म फी** | **बयाणा रक्कम ( E.M.D )** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भाजीपाला ( सन 2026-27 ) | वित्तीय लिफाफा-ब प्रमाणे | 971793 /- | 4000/- | 20000/- |

ऑनलाईन निविदा विक्री दिनांक
ऑनलाईन निविदा स्विकृती दिनांक
ऑनलाईन तांत्रिक निविदा उघडणे दिनांक
ऑनलाईन व्यापारी निविदा उघडणे दिनांक

सोबतच्या निविदा वेळापत्रका नुसार

### निविदा सुचना

1. निविदा ऑनलाईनच भरण्यात यावी.
2. अपुर्ण व सशर्त तसेच अटींची पुर्तता न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
3. ऑनलाईन अपलोड केलेली निविदेची कागदपत्रे स्वसाक्षांकीत असणे आवश्यक, निविदा सादर करतांना तांत्रिक लिफाफ्यातील अनुक्रमांकानुसार कागदपत्र ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील.
4. निविदेच्या वेळेपत्रकानुसार निविदा उघडणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास खरेदी समिती निश्चित करेल त्या दिनांकास निविदा उघडण्यात येतील. या निविदा बाबत यापुढे दिलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त काही अतिरिक्त अटी व शर्ती यांचा समावेश करण्याचा किंवा कमी करण्याचे अधिकार खरेदी समितीने राखून ठेवलेला आहे व अशा अतिरिक्त अटींचा पुरवठा आदेशात व करारनाम्यात समावेश करण्यात येईल. तसेच निविदेतील खरेदीची रक्कम व वस्तु या अंदाजित असून त्यामध्ये प्रत्यक्ष वस्तूंच्या मागणी व परिमाणानुसार बदल होऊ शकेल.
5. प्रि-बीड साठीच्या शंका निविदाकारांनी प्रि-बीड दिनांकाच्या आदल्या दिवशी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत **cafonagpur@gmail.com** ईमेलद्वारे सादर करणे आवश्यक राहील. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार

केला जाणार नाहीत. शंका विचारण्याकरीता परिशिष्ठ- 06 हे या निविदा अर्जाचे पृष्ठ क्र-18 वर देण्यात आलेला आहे. शंका/प्रश्न केवळ विहीत नमुण्यात असणे आवश्यक आहे.

## निविदेचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यालय स्तरावरील कार्यवाही | निविदाकारांच्या स्तरावरील कार्यवाही | कार्यवाही सुरुवात होण्याचा दिनांक व वेळ | कार्यवाही समाप्त होण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | निविदा प्रकाशित करणे | ------ | 14/05/2026 सकाळी 10.00 वा. | 14/05/2026 सायं 05.00 वा. |
| 2 | ------ | निविदा डाऊन लोड करणे व निविदा तयार करणे | 14/05/2026 सकाळी 10.00 वा. | 29/05/2026 सायं 05.00 वा. |
| 3 | ------ | निविदा सादर करणे | 14/05/2026 सकाळी 10.00 वा. | 29/05/2026 सायं 06.00 वा. |
| 4 | निविदापुर्व (Pre-Bid) सभा | ------- | 19/05/2026 दुपारी 01.00 वा. | |
| 5 | तांत्रिक लिफाफा उघडणे | -------- | 01/06/2026 ऑनलाईन पद्धतीने अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपुर यांच्या दालनात | |
| 6 | व्यापारी लिफाफा उघडणे | -------- | व्यापारी लिफाफा उघडण्याबाबतचा दिनांक या कार्यालयाचे सुचना फलक व ई-निविदा पोर्टलवर कळविण्यात येईल. | |

**महत्वाच्या सूचना :**

| | |
|---|---|
| 1 | निविदा फार्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. ऑनलाईन निविदा फार्म शुल्क भरुन निविदा डाऊनलोड करता येतील. निविदेचे विस्तृत वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 2 | सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या Portal वर Enroll करणे आवश्यक आहे. |
| 3 | निविदेच्या वेळापत्रकातील बदल कार्यालयाच्या सुचना पटलावर तसेच ऑनलाईन E-Tender नोटीस बोर्डवर वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, या बाबत कोणत्याही निविदाकारास व्यक्तीशः संपर्क करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. |
| 4 | निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत असल्याने निविदाकारांनी निविदा उक्त नमुद संकेतस्थळावरुन सादर कराव्यात पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्किारण्यात येणार नाही. तसेच निविदेच्या बाबतीत काही सुचना/आक्षेप/तक्रारी असल्यास व्यापारी लिफाफा उघडण्यापूर्वी पर्यंत अशा सुचना आक्षेप/तक्रारी या कार्यालयाच्या cafonagpur@gmail.com ई-मेल वर सादर करणे क्रमप्राप्त राहिल. निविदेच्या संदर्भात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कार्यालयातील कोणत्याहीअधिकारी/कर्मचाऱ्यास संपर्क साधू नये अगर दबावतंत्राचा वापर करु नये. |
| 5 | निविदा फॉर्म शुल्क व बयाणा (EMD) रक्कम ऑनलाईन स्वरुपात (Online Payment Gateway Mode) द्वारे भरणे आवश्यक आहे. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग दिनांक 01.12.2016 मधील तरतुदीनुसार निविदा फॉर्म फी बयाणा (EMD) रक्कम भरण्यास सुट असल्यास त्याविषयी योग्य कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करणे (To Be Uploaded) बंधनकारक आहे. E-Payment Gateway संदर्भात आवश्यक माहिती ई-निविदा वेब साईट https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे. |
| 6 | निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन Enrollment करणे संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्या संदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. 0712-2560127/2560314 |
| 7 | सर्व इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, सदर निविदेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्यात येईल. काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास वेबसाईट https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरील मदत |

| | |
|---|---|
| | केंद्रावर संपर्क करावा, इंटरनेट, विद्युतपुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच वरील वेळापत्रकानुसार त्या-त्या स्तरावर कार्यवाही यशस्वीरित्या पुर्ण करावयाची जबाबदारी ही निविदाकारांची राहील. ईमेल, फॅक्स, हस्तेपोच इत्यादी द्वारे सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. |
| 8 | सदर निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किवा शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे, एकापेक्षा जास्त पुरवठादारांची नेमणूक करणे व इतर बाबतचे संपुर्ण हक्क व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर यांनी राखून ठेवले आहेत. |
| 9 | निविदेतील नमुद वेळापत्रकानुसार Pre-Bid Meeting घेण्यात येईल. Pre-Bid Meeting मध्ये शंका विचारण्याकरीता परिशिष्ठ- 06 हे या निविदा अर्जाचे पृष्ठ क्र-18 वर देण्यात आलेला आहे. शंका/प्रश्न केवळ विहीत नमुण्यात असणे आवश्यक आहे. |
| 10 | खालील निविदा नाकारण्यात येतील या बाबत कोणत्याही प्रकारची विनंती अगर युक्तीवाद ऐकूण घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.<br>1. लिफाफा क्र. 1 व 2 मधील कागदपत्रांवर कोणत्याही प्रकारचे उपरोलेखन किंवा खाडाखोड असलेल्या निविदा नाकारण्यात येतील.<br>2. निविदाकारांच्या स्वाक्षरी नसलेल्या निविदा नाकारण्यात येतील,<br>3. निविदेमधील आवश्यक व विहीत केलेले सर्व नमुने सही शिक्यानिशी परिपूर्ण भरणे आवश्यक राहील.<br>4. लिफाफा क्रं. 1 सोबत सादर करण्यात येणारे कागदपत्र स्वः सांक्षांकीत केलेले नसल्यास अशा निविदा अपूर्ण समजून नाकारण्यात येतील. |

# ई-निविदे च्या सर्वसाधारण अटी व शर्ती

| | |
|---|---|
| 1 | निविदाकाराने निविदा अर्ज ऑनलाईन पध्दतीने (ई-निविदा) विहीत नमुन्यात व पूर्ण भरणे आवश्यक आहे. अपूर्ण, चुकीचा व अन्य कोणत्याही स्वरुपातील निविदा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. निविदा भरतांना येणाऱ्या अडचणी जसे Internet Connectivity, Server speed, विद्युत पुरवठा इत्यादी बाबत या विभागाची कोणतेही जबाबदारी राहणार नाही. निविदा सादर करतांना तांत्रिक लिफाफ्यातील अनुक्रमांकानुसारच कागदपत्र निविदेत सादर करावेत. |
| 2 | निविदा दर केवळ व्यापारी लिफाफ्यात Online BOQ मध्ये सादर करणे बंधनकारक असुन निविदेत अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. तसेच निविदाधारकांना निविदा सादर करताना BOQ मधील सर्व बाबींचे दर भरणे बंधनकारक राहील. व त्यानुसार सर्व दरांची एकुणात एकुण ज्या निविदाकाराची एकुणात कमी येईल त्यांना न्युनतम दरधारक ग्राहय धरण्यात येईल. |
| 3 | निविदेसोबत अपलोड केलेल्या कागदपत्रांची तपासणी मुळ कागदपत्रांवरून तांत्रिक लिफाफा उघडतेवेळी करण्यात येईल, निविदाकाराने सादर केलेली कागदपत्रे बनावट/चुकीची आढळल्यास अशा निविदाकाराची निविदा विचारात घेतली जाणार नाही व त्याच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा निविदाकारास भविष्यात आदिवासी विकास विभागाच्या कोणत्याही निविदेत भाग घेता येणार नाही. |
| 4 | सदरच्या ई-निविदेस सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाकरीता प्रसिध्दी देण्यात येत असुन, जर तीन ग्राहय तांत्रिक लिफाफे/ई-निवीदा प्राप्त न झाल्यास पुन्हा निविदेस मुदतवाढ देण्यात येईल. इतर अटी व शर्ती इत्यादी माहितीसाठी निविदा शुल्क (नापरतावा) ऑनलाईन प्रणाली द्वारे भरुन ऑन लाईन निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊन लोड करता येतील, प्राप्त निविदा संपुर्ण अथवा अंशतः नाकारणे किंवा पुन्हा मागविणे याबाबतचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपुर यांनी राखून ठेवलेले आहे. |
| 5 | काही अपरिहार्य कारणामुळे वरील ठिकाण वेळेत व दिनांकास निविदा उघडणे शक्य नसल्यास आणि निविदा प्रक्रिये बाबत होणाऱ्या बदलाचा तपशील अगर तशी सुचना ऑन लाईन निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर तसेच या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या बाबत निविदाधारकां सोबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही व सर्व बदल निविदाधारकांवर बंधनकारक राहतील. |
| 6 | निविदेतील दर सन 2026-27 या शैक्षणिक वर्षा करिता वैध राहतील. मात्र त्यापुढील वर्षाची ई- निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यास काही अपरीहार्य कारणाने विलंब होत असेल तर अशा वेळी पुरवठाधारकाचे काम समाधानकारक असल्यास प्रकल्प अधिकारी यांचे शिफारशी नुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर हे नविन निविदेचे कार्यारंभ आदेश होईपर्यंत मुदतवाढ देतील. (अशी मुदतवाढ कोणत्याही परीस्थितीत 6 महिन्यापेक्षा अधिक कालावधीची किंवा पुरवठा आदेशाच्या रकमेच्या 50% पेक्षा जास्त नसेल यापैकी जे आधी घडेल त्याप्रमाणे देण्यात येईल.) वाढीव मुदतवाढ दिल्यास पूरवठा आदेशातील मंजूर दराने पूरवठादारास साहित्य/माल पुरवठा करणे बंधनकारक राहिल. |
| 7 | ई निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्रं.1 (तांत्रिक) उघडून त्यामध्ये आवश्यक कागदपत्रांची व अटी-शर्तीची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. त्यामध्ये त्रृटी आढळल्यास निविदाधारकाने दिलेला लिफाफा क्रं.2 (दरपत्रक) उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द करण्यात येईल. तांत्रिक निविदे बाबत निविदाकारास व्यापारी लिफाफा उघडण्यापूर्वी आक्षेप या कार्यालयास नोंदविता येतील. मात्र व्यापारी लिफाफा उघडण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक लिफाप्याच्या बाबतीत कोणताही आक्षेप नोंदविता येणार नाही आणि मुदती अंती आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाही. |
| 8 | ज्या निविदाकाराची निविदा नामंजूर करण्यांत येईल त्यांची बयाणा रक्कम (EMD) न्युनतम दरधारक (पुरवठाधारक) यांना पुरवठा आदेश दिल्यानंतर परत करण्यात येईल. मात्र ज्यांची निविदा मंजूर केली जाईल त्यांना पुरवठा आदेशात दिलेल्या मुदतीत सुरक्षा ठेव (बँक गॅरंटी) जमा करावी लागेल. तसे न केल्यास किंवा असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल. बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देण्यात येणार नाही. |
| 9 | निविदा स्विकृत झाल्यानंतर उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 01.12.2016 मधील 4.6.अ(१) व 4.6.अ(2) मधील तरतुदीनुसार पुरवठा आदेशाच्या रकमेच्या 3 % रक्कम सुरक्षा ठेव ( अपर आयुक्त, आदिवासी विकास,नागपुर यांचे नावे डिमांड ड्राप्ट) म्हणून निविदेचा निकाल अधिसूचित (कार्यारंभ आदेश निर्गमित दिनांक) करण्यात आल्याच्या15 दिवसांच्या आंत अपर आयुक्त, कार्यालयात जमा करुन मुद्रांकपेपर वर विहीत करारनामा करावा लागेल.करारनामा न करता पुरवढा सुरु केल्यास त्या देयकांची पुर्तता केली जाणार नाही. पुरवठयाची कार्यवाही समाधानकारक पुर्ण झाल्यानंतर व कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास सुरक्षा ठेव परत करण्यात येईल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच निविदा धारकाने निविदेतील कोणत्याही टप्यावर माघार घेतल्यास त्याची बयाणा रक्कम शासनास जमा करण्यात येईल. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदाधारकास बयाणा रक्कम परत करण्यात येईल अशी रक्कम परत करण्यास उशीर झाल्यास निविदाधारकास कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचा अधिकार राहणार नाही. |
| 10 | माल पुरवठ्यासंबधी स्विकृत निविदाकारास प्रचलीत नियमानुसार करारनामा करुन देणेसाठी लागणारे मुंद्राक शुल्क तसेच करारनाम्यासाठी लागणारा अनुषंगीक खर्च पुरवठादारास करावा लागेल. त्यानंतर महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 |

| | |
|---|---|
| | च्या अनुसुची । मधील अनुच्छेद 63 मध्ये दिनांक 24 एप्रिल 2015 रोजी केलेल्या सुधारणेनुसार कार्यकंत्राटाशी संबंधित करारपत्र किंवा प्रतिभूती किंवा करारबंधपत्र या संलेख तथा दस्तावर देय होणारे मुद्रांक शुल्क रु.10,00,000/- पर्यंतच्या रकमेकरिता रु.500/- निर्धारित करण्यात आलेले आहे, तर रु. 10,00,000/- वरील रकमेस 0.1% किंवा जास्तीत जास्त रु.25,00,000/- च्या मर्यादेत मुद्रांक शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार विहीत करारनामा करावा लागेल. |
| 11 | 1) निविदेत नमूद केलेले दर हे आवश्यक त्या इतर सर्व खर्चासह तथा करासह शासकीय आश्रमशाळा स्तरवर पोहोच राहतील. नमुद दर हे भारतीय रुपयामध्ये राहतील.<br>2) अंदाजित खरेदी करावयाची नग संख्या अपर आयुक्त, यांनी निविदेत समाविष्ट केली असून त्यामध्ये कमी / जास्त होण्याची शक्यता असल्याने याबाबतचे सर्व अधिकार निविदा प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहे.<br>3) पुरवठादारास निविदेतील विद्यार्थीसंख्या परिमानावर हक्क सांगता येणार नाही. |
| 12 | ज्याची निविदा मंजूर होईल अशा निविदाकारांना निविदेतील विहीत केलेल्या स्पेशिफीकेशन नुसार व मुख्याध्यापक यांचे मागणीनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहिल. |
| 13 | कराराच्या अनुषंगाने लागणारे (GST) वगळून सर्व कर, शुल्क, मुंद्राक शुल्क, वाहतूक शुल्क, व इतर कोणताही अनुषंगीक खर्च ही पुरवठादाराची जबाबदारी असेल. भविष्यात या अनुषंगाने वसुलपात्र रक्कम आढळल्यास ती संबंधीत पुरवठादाराकडुन वसुल करणेत येईल. |
| 14 | पुरवठा आदेश दिल्यापासून 15 दिवसाच्या आत पुरवठा सुरु करावा लागेल तसेच शासकीय आश्रमशाळा स्तरावर संपर्क करुन शाळा स्तरावरुन कळविण्यात आलेल्या मागणीनुसार पुरवठा करावा लागेल. मुदतीत पुरवठा सुरु न केल्यास किंवा पुरवठयाची असमर्थता दर्शविल्यास पुरवठ्याचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम (बॅक गॅरंटी) जप्त करण्यात येईल व कार्यालयाचे होणारे कोणतेही नुकसान पुरवठादाराकडून वसुल करणेत येईल व शासनाच्या झालेल्या नुकसानीबाबत कायदेशीर कारवाई केली जाईल. |
| 15 | ज्या पुरवठादाराचे दर मंजूर होतील त्या पुरवठादारास वर नमुद केल्यानुसार शासकीय आश्रमशाळा स्तरावर पुरवठा वस्तुंची वाहतुक स्वखर्चाने करुन पोहोच करावी लागेल. या संदर्भातिल आदेशामध्ये दुरुस्ती करण्याचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर यांना असतील. |
| 16 | पुरवठादाराच्या अपु-या पुरवठयामुळे व मालाची निकड लक्षात घेता किंवा पुरवठा वेळेत न केल्यास प्रकल्प कार्यालय किंवा या कार्यालयस्तरावरुन स्थानिक रित्या जास्त दराने माल खरेदी करावा लागला तर शासनाचे झालेले नुकसान पुरवठाधाराकडून वसूल केले जाईल. या अनुषंगाने करार रद्द करणे किंवा कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना राहतील. व याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचा निर्णय अंतिम राहील. |
| 17 | **-साहित्याची पोहोच पावती 2 प्रकारात देयकासोबत जोडावी लागेल.**<br>**1) ज्या दिवशी साहित्य शाळेवर पोहोच करण्यात येईल त्यावेळी पोच पावतीचा GPS Tag Photo (जिओ-टॅगिंग) घेण्यात यावा. सदर फोटो मध्ये शाळेचे ठिकाण, तारीख आणि वेळ स्पष्ट पणे दिसणे आवश्यक आहे. पोच पावतीचा GPS Tag Photo (जिओ-टॅगिंग) केलेला फोटो घेणे हि जबाबदारी पुरवठाधारक यांची असेल. अन्यथा पोच पावती ग्राहय धरण्यात येणार नाही.**<br>**2) मुळ पोच पावती.**<br>**-पोच पावती च्या मागे साहित्य ताब्यात घेताना तिथे उपस्थित असलेले महिला अधिक्षिका, वर्ग-4 चे कर्मचारी व 2 विदयार्थी यांनी साहित्य ताब्यात घेताना उपस्थित होते व त्याच्या स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे.** |
| 18 | देयके 4 प्रतित सादर करावे लागेल. 1 प्रत मुख्याध्यापक यांचे करीता, 1 प्रत प्रकल्प अधिकारी यांचे करीता व 2 प्रत अपर आयुक्त कार्यालय करीता.<br>देयके हि अपर आयुक्त्, नागपुर स्तरावरुन अदा होणार असल्याने देयक हे मा.अपर आयुक्त्,आदिवासी विकास विभाग,नागपुर यांचे नावे असावे. देयक मुख्याध्यापक यांना सादर करावे. मुख्याध्यापक सदर देयक तपासणी करीता प्रकल्प अधिकारी यांना सादर करतील. प्रकल्प अधिकारी देयक अदा करण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्रासह मा.अपर आयुक्त, नागपुर कार्यालयास अदा करणे करीता सादर करतील. |
| 19 | पुरवठा केलेले साहित्य विहीत दर्जाचे आढळून न आल्यास पुरवठादाराने तात्काळ स्वखर्चाने बदलून देणे बंधनकारक राहील. बदलून दिलेल्या मालासाठी झालेला अतिरिक्त खर्च पुरवठादारास देण्याची या विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. |
| 20 | काही अपरिहार्य कारणामुळे बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास विलंबाबद्दल व्याज दिले जाणार नाही. अगर पुरवठादारास कायदेशीर रित्या कारवाई करता येणार नाही. |
| 21 | एकुण मालाच्या मागणीनुसार पुरवठा आदेशातील विनिर्देशानुसार माल पुरवठा झाल्यानंतर प्राप्त पोहोच पावती तपासुन पुरवठा मालाच्या किंमतीच्या 80% रक्कम निधी उपलब्धतेनुसार देयक पारीत करण्यात येईल, तसेच शासकीय आश्रमशाळा मुख्याध्यापक यांनी माल/वस्तु सुस्थितीत विनिर्देशाप्रमाणे प्राप्त झालेचे अहवाल तसेच पुरवठ्याच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याबाबत खात्री केल्याचा अहवाल मुख्याध्यापक यांनी सादर केल्यानंतर उर्वरीत 20% रक्कम अदा करण्याची |

| | |
|---|---|
| | कार्यवाही करण्यात येईल. |
| 22 | पुरवठा कालावधी मध्ये ज्या शासकीय आश्रमशाळेच्या स्तरावर वस्तुंचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या त्या मालाच्या किंमतीवर 0.5 % प्रती आठवडा या प्रमाणे दंड आकारण्यात येईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे असेल.<br>अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत 2 लाखा पेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या 10% दंड.<br>ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत 2 लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या 5% दंड |
| 23 | शासनाचे हित लक्षात घेऊन सदर निविदेतील एखादी किंवा अधिक अटी-शर्ती शिथिल करण्याचा, अर्थ लावण्यांचा तसेच कोणतीही निविदा पुर्णतः अथवा अंशतः मंजुर करण्याचा तसेच एखादी अगर सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा संपुर्ण अधिकार अपर आयुक्त आदिवासी विकास,नागपुर यांनी राखून ठेवला आहे. |
| 24 | उपद्रवकारक तक्रारीबाबत शासन निर्णय 01.12.2016 मधील परिशिष्ट 5.8.1 नुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| 25 | पुरवठाधाराकासोबत करण्यात येणाऱ्या करारासंबधी काही वाद निर्माण झाल्यास सदर वादाबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील व तो निविदाधारकावर बंधनकारक राहील. |
| 26 | ई-निविदेतील न्युनतम दरधारक (**L**-1) यांना उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक 01.12.2016 रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तीकेत विहीत केलेली कार्यपध्दती तसेच शासनाचे प्रचलित नियम व Central Vigilance Commission यांची मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन निविदा अंतिम करण्यात येतील. |
| 27 | उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 1.12.2016 मधील परिच्छेद क्रमांक 3.1.2.1 नुसार किंमतीचा अंदाज आणि किमतीचा वाजवी पणा बाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| 28 | पुरवठाधारकाने पुरवठा अचानक बंद केल्यास, पुरवठयामध्ये अनियमितपणा दिसुन आल्यास पुरवठा आदेश रद्द करुन सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल, तसेच त्यांचे नाव आदिवासी विकास विभागाच्या पुरवठादारांच्या काळया यादीत टाकण्याबाबत कारवाई करण्यात येईल. |
| 29 | निविदाधारकास पुरवठा आदेश मंजूर झाल्यास त्यानी उच्च दर्जाचे माल/वस्तु पुरविणे बंधनकारक राहील, परंतु पुरविण्यात आलेल्या वस्तुंमुळे विषबाधा सारखे काही प्रकार घडल्यास त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व त्यांची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकांची राहील. |
| 30 | सदर निविदे संदर्भात कोणताही वाद उद्भवल्यास अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपुर यांचा निर्णय अंतिम राहील अथवा न्यायालयीन कार्यक्षेत्र नागपुर जि- नागपुर हे राहील. |
| 31 | वसतिगृहातील विद्यार्थी संख्या क्षमते पेक्षा कमी जास्त करण्याचे अधिकार अपर आयुक्त, नागपुर यांनी राखून ठेवले आहेत. कार्यालयाने निर्देशित केलेल्या संभाव्य विद्यार्थी संख्येनुसारच सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल. |
| 32 | पुरवठा करण्यात येत असलेल्या वस्तुच्या गुणवत्ता परिक्षणाची गरज पडल्यास तपासणी करीता येणारा खर्च पुरवठाधारकास करावा लागेल. |

वरील 01 ते 32 अटी व शर्ती मी वाचल्या असुन मला त्या समजल्या आहेत व मला मान्य आहेत. त्या बाबत माझी / आमची कोणतीही तक्रार नाही. आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असुन ती निविदे सोबत सादर करण्यात आलेली आहेत.

**ठिकाण**:-

**दिनांक**:-

निविदा धारकाची स्वाक्षरी-----------------------

निविदा धारकाचे नांव ----------------------

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)

**अपर आयुक्त**

**आदिवासी विकास नागपुर**

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प वर्धा जि- वर्धा अधीनस्त शासकीय आश्रमशाळा-** हिरापुर ता.देवळी **जि- वर्धा येथे भाजीपाला पुरवठा करणे. सन 2026-27 करीता**

**तांत्रिक लिफाफा क्रमांक- 01**

| | |
|---|---|
| **Technical Document No 1** | निविदा शुल्क व बयाणा रक्कम (EMD)भरणा केल्याची प्रत.निविदेची बयाणा रक्कम व निविदा शुल्क निविदाधारक फर्म/ संस्था / बचत गटाच्या नावे Digital Signature Certificate याद्वारे ऑनलाईन नेटबँकींग सुविधा असलेल्या बँक खात्यातून स्वखर्चाने Online Payment GatewayMode याद्वारे ई-पेमेंट करणे आवश्यक आहे अन्यथा सदर बाबत वाद निर्माण झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. शासन निर्णय 1.12.2016 मधील परिच्छेद क्र.6.8 परिशिष्ट 8 मधील सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम- 2006 अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्या पासुन सुट देण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या साहित्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. त्याकरीता बयाणा रक्कम व निविदा शुल्क सूट असल्याचे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग संचालनालयातील (MSME) महाव्यवस्थापक प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळाचे प्रमाणपत्र वा निविदेतील उक्त व्यवसायाचे निविदाधारक व्यक्ती/फर्म/सहकारी संस्थाच्या नोंदणी प्रमाणपत्र (MSME चे UDYAM Registration Certificate) सादर करावे. **सदर प्रमाणपत्रात पुरवठा करावयाच्या बाबी संबधित उल्लेख असणे आवश्यक आहे. अन्यथा सुट ग्राहय धरण्यात येणार नाही.** |
| **Technical Document No 2** | निविदाकाराच्या नावाचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे सक्षम प्राधिकाऱ्यांचे निविदा कालावधीचे अनुज्ञाप्ती (License) प्रमाणपत्र व FSSAI चे वैध- STATE LEVEL (ई-निविदेच्या प्रसिद्धी दिनांकानंतर विधीग्राह्य असणे आवश्यक आहे.) नोंदणी प्रमाणपत्र (नमुना-क) त्यांत पुरवठा संबधित उल्लेख असणे आवश्यक आहे. |
| **Technical Document No 3** | 31 मार्च 2026 अखेरचे व्यवसाय कर (professional tax) भरल्याचे चलन किंवा निपटारा प्रमाणपत्र (Maharashtra State Tax on Profession Treads Callings Employments Act. Added Tax Act. 1975) अंतर्गत. (PT No Dues/Clearance Certificate) जोडण्यात यावे. |
| **Technical Document No 4** | निविदेत नमुद खरेदी करावयाच्या बाबीचे व्यवसाय नोंदणीबाबत शहरी भागामध्ये मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 अंतर्गत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट एनरोलमेंन्ट प्रमाणपत्र) नमूना ड व ग्रामिण भागामध्ये ग्रामपंचायत/ ग्रामसेवक यांचे विधीग्राह्य असलेला वैध कालावधीचा नुतनीकरण प्रमाणपत्र. |
| **Technical Document No 5** | निविदाधारक व्यक्ती/ फर्म प्रोप्रायटर / बचत गट / सहकारी संस्था इत्यादींचे नावे PAN कार्डची छायांकित प्रत.<br>तसेच भागीदारी संस्था Partnership Firm/ संयुक्त् उपक्रम Joint Venture बाबतीत सदर संस्थांचे सर्व सहभागी भागीदार हे स्वत: उपस्थित राहुन सदर निविदेच्या सेवा संपुर्ण निविदा कालावधीत पुरविण्यास बांधील राहतील. तसेच सदर निविदेचे सर्व दायीत्व सर्व सहभागी भागीदारामध्ये 100% सामायीकरित्या समप्रमाणात विभागलेले असतील. अशा पध्दतीचे हमीपत्र रुपये 500/- मात्र इतक्या किमतीच्या मुंद्राकांवर नोटरी करुन सादर करण्यात यावे. (Joint Venture असल्यास तसे आवश्यक दस्ताऐवज.) |
| **Technical Document No 6** | निविदाधारकाच्या नावाने असलेले वस्तु व सेवा कर नोंदणी (GST Registration Certificate) प्रमाणपत्र. |
| **Technical Document No7** | दि. 31 मार्च 2026 अखेरचे वस्तु व सेवा कर GST भरणा केल्याचे प्रमाणपत्र**(GSTR-1/ GSTR-3B/ GSTR-9) विवरण तसेच मार्च 2026 अखेरचे GSTR-1/ GSTR-3B** विवरण जोडण्यात यावे |
| **Technical Document No 8** | निविदाधारकाने मागील 5 पैकी 3 वर्षाचे आयकर भरल्याचे (ITR)प्रमाणपत्र ( सन 2021-22, सन 2022-23, सन 2023-24,सन 2024-25 आणि सन 2025-26) (सन 2024-25 किंवा सन 2025-26 चे ITR जोडणे बंधनकारक आहे) |

| | |
|---|---|
| **Technical Document No 9** | निविदाकाराचे मागील 5 पैकी 3 वर्षाचे ( सन 2021-22, सन 2022-23, सन 2023-24,सन 2024-25 आणि सन 2025-26) लेखापरीक्षणकृत ताळमेळपत्र Audited Balance Sheet तसेच लेखापरीक्षणकृत नफा तोटा विवरणपत्र Audited Profit & Loss Statementसादर करावे. (सन 2024-25 किंवा सन 2025-26 चे जोडणे बंधनकारक आहे) |
| **Technical Document No** 10 | निविदाधारक संस्था असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र (संस्था नोंदणी अधिनियम 1860 व 1950) उदा. सहाय्यक निबंधक व पुरूष/ महिला बचत गट असल्यास नोंदणी प्रमाणपत्र/ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा /महिला आर्थिक विकास महामंडळ / नाबार्ड योजनेखाली स्थानिक स्वराज्य संस्था यांचेद्वारा स्थापन झालेले व नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| **Technical Document No** 11 | निविदाधारकाने मागील 5 वर्षापैकी (सन 2021-22, सन 2022-23, सन 2023-24,सन 2024-25 आणि सन 2025-26) कोणत्याही 3 वर्षाची किमान **सरासरी उलाढाल** निविदेच्या अंदाजित किमतीच्या 33% असल्याचे सनदी लेखापालाचे **(CA)** यांचे **UDIN** क्रमांकासह प्रमाणपत्र. **(कोणत्याही 03 वर्षांची सरासरी उलाढाल हि 33% असल्याने, निविदाधारकाची 03 वर्षांची एकुण उलाढाल हि निविदा रकमे ऐवढी असावी.)**<br>निविदाधारकाने एकापेक्षा जास्त निविदेत सहभाग नोंदविला असल्यास वरील नमूद मागील 5 वर्षापैकी कोणत्याही 3 वर्षाची सरासरी उलाढाल ही सहभाग नोंदविलेल्या प्रकल्प कार्यालयाच्या निविदेची असलेली अंदाजित किमत व त्यांची होणारी एकत्रीत बेरजेच्या 33% असल्याबाबत मान्यता प्राप्त सनदी लेखापाल यांचे (UDIN) क्रमांकासह प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.<br>एकापेक्षा जास्त ठिकाणी निविदाकाराने सहभाग नोंदविल्यास सरासरी 33% उलाढालीनुसार तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरविण्याचे अधिकार खरेदी समितीस राहतील. |
| **Technical Document No** 12 | निविदाकाराचा सरकारी/ निमसरकारी संस्थेस मागील 5 वर्षापैकी (सन 2021-22, सन 2022-23, सन 2023-24,सन 2024-25 आणि सन 2025-26) कोणत्याही 3 वर्षाचा या निविदेत नमुद बाबीतील भाजीपाला/अंडी/केळी/मटन-चिकन/खाद्यांन्न सरकारी/ निमसरकारी संस्थाना पुरवठा केल्याचा अनुभव गृहित धरण्यात येईल. **(खाजगी संस्थांना केलेल्या पुरवठा चा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही.)** तसेच त्या करीता कार्यारंभ आदेशाच्या अनुषंगाने पुरवठा समाधान कारक केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यांचे रकमेसह अनुभव प्रमाणपत्र (अनुभव दाखला) जोडणे आवश्यक राहील.<br>**पुरवठाधारकांना निविदा रकमेच्या कमीतकमी 33% रकमेचा अनुभव असणे आवश्यक आहे.**<br>प्रमाणपत्रात खालील बाबींचा अंतर्भाव असावा.<br>1. पुरवठयाचा तपशिल, 2. पूरवठयाचा कालावधी , 3. एकूण पुरवठयाची रक्कम<br>4. शेरा-समाधानकारक/असमाधानकारक इत्यादी. |
| **Technical Document No** 13 | उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक 01.12.2016 मधील परिच्छेद क्र. 5.14 च्या व्याप्तीमध्ये सेवा, स्थापत्य किंवा वाहतुक या बाबी राखीव नसल्या तरी अनुसूचित जाती/ जमातीच्या निविदाधारकांना प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. 16/2016 मध्ये दिलेला निर्णय विचारात घेऊन व परिच्छेद क्र. 5.14 च्या धर्तीवर 4% आरक्षण अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमातीच्या निविदाधारक व्यक्ती/ बचत गट/ सहकारी संस्था/ संयुक्त् उपक्रम (दोन्हीही भागीदार अनुसुचित जाती/ जमातीचे असणे बंधकारक)/ भागीदारी संस्था यांना राखीव ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार अपर आयुक्त् निहाय राखीव ठेवावयाच्या प्रकल्पाची निवड खालील मार्गदशक सुचनेनुसार करण्यात येईल.<br>(अ) अपर आयुक्त, निहाय ज्या शाळेंना निविदेतील नमूद बाबीचा पुरवठा करावयाचा आहे अशा शाळेंची एकूण बेरीज करावी (मध्यवर्ती स्वयंपाकगृहांच्या शाळा वगळण्यात याव्यात)<br>उदा. एखादया अपर आयुक्त, कार्यक्षेत्रात एकूण 100 आश्रमशाळा असतील तर त्याच्या 4% म्हणजेच 4 शाळा होतील. त्या अपर आयुक्त कार्यक्षेत्रात ज्या प्रकल्पातील आश्रमशाळेंची संख्या किमान 4 किंवा त्याच्या जवळची असेल तो प्रकल्प वर नमूद प्रमाणे अनुसूचित जाती किंवा जमातीसाठी राखीव ठेवण्यात येईल. मात्र उक्त आरक्षाणानुसार संबंधीत निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र न ठरल्यास अशा निविदाकारांना अपात्र ठरविण्यात येईल व सदर प्रकल्पांची ई-निविदा आरक्षणामधुन खुली करण्यात येईल. व संबंधीत प्रकल्पाची नव्याने ई-निविदा प्रसिध्द करण्यात येईल. **प्रकल्प कार्यालय चिमुर** |

| | |
|---|---|
| | **येथील ३ आश्रमशाळा ( चंदनखेडा, चिंधिचक व कोसंबी) अनुसुचित जाती/जमाती करीता आरक्षीत ठेवण्यात येत आहेत.** |
| **Technical Document No** 14 | सदर निविदेत भाग घेणे, निविदेची कागदपत्रे सादर करणे, बैठकीकरीता उपस्थित राहण्याकरीता तसेच निविदेविषयक कामकाज पाहण्याकरीता प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याचे पत्र देण्यात यावे. **(सोबत नमुना क्र. 1 जोडला आहे)** |
| **Technical Document No** 15 | निविदाकारास निविदेतील अटी व शर्ती मंजूर असल्याचे, काळया यादीत समाविष्ट नसल्याचे व इतर बाबीसदर्भात प्रतिज्ञापत्र रु. 500/- इतक्या रकमेच्या मुद्रांकावर सादर करणे आवश्यक आहे. **(सोबत नमुना क्र. 2 जोडला आहे)** |
| **Technical Document No** 16 | **स्टार्ट-अप संस्था असल्यास**- उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्र. ३.१.२.९ मधील मुद्दा क्र.०३ मध्ये "जो घटक नाविण्यपुर्ण तंत्रज्ञान व बौध्दिक संपदेच्या आधारे नविन उत्पादने, प्रक्रिया किंवा सेवांचा विकास, उपयोगीता या वाणिज्यिकरण्याच्या संबधित कार्य करीत असेल" अशी बाब नमुद करण्यात आलेली आहे.<br>त्यानुसार भाजीपाला/केळी/अंडी/मटन-चिकन,गोड पदार्थ संबधित उत्पादन,प्रक्रिया किंवा सेवांचा विकास, उपयोगीता बाबत चे पुरावे सोबत जोडण्यात यावेत. तसेच आपले प्रमाणपत्रामध्ये पुरवठाकरावयाच्या बाबी संबधित आपले स्टार्ट-अप असल्याचा उल्लेख स्पष्ट असावा.<br>**पुरवठा करावयाच्या बाबी/वस्तु या विदयार्थ्यांचे आरोग्याशी संबधित असल्याने ३ वर्षांचा आवश्यक रकमेचा अनुभव नसलेल्या स्टार्ट अप संस्थांना अनुभवातुन सुट देय राहणार नाही,परंतु फॉर्म फी व बयाना रकमेतुन सुट राहील.** |
| **Technical Document No** 17 | निविदाधारकाने स्वक्षांकित केलेला संपुर्ण निविदा फॉर्म (पान क्रमांक 01 ते 17) |

उक्त नमुद तांत्रिक निविदा फॉर्म (**Technical Document No** 01 **To** 17) च्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे अनावश्यक वा अतिरिक्त कागदपत्रे निविदेत तांत्रिक लिफाफ्यासोबत जोडलेली नाहीत/ अपलोड केलेली नाहीत.

वरील कागदपत्रांच्या संदर्भात "जोडावे/ अपलोड करावे" याचा अर्थ स्पष्ट वाचनीय **PDF** फाईल्स तयार करून स्कॅन करून सादर करावीत असा अर्थ आहे.(**प्रत्येक Technical Document ची वेगळी PDF करुन त्यावर संबधित Document कशाचे आहे ते लिहावे.**)

**ठिकाण:-**

**दिनांक: -** **निविदाकाराची स्वाक्षरी, नांव,**
**पत्ता व शिक्का**

महाराष्ट्र शासन
अपर आयुक्त,आदिवासी विकास,नागपुर.
आदिवासी विकास भवन,पहिला मजला,गिरीपेठ,अमरावती रोड
नागपुर पिन ४४००१०
Email ID : cafonagpur@gmail.comदुरध्वनीक्र. ०७१२-२५६०१२७/२५६०३१४

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प वर्धा जि- वर्धा अधीनस्त शासकीय आश्रमशाळा-** - हिरापुर (तळणी) ता.देवळी **जि- वर्धा येथे भाजीपाला पुरवठा करणे. सन** 2026-27 **करीता**

## व्यापारी / दरपत्रक लिफाफा क्र.02 (दर BOQ File मध्ये नमुद करावेत)

- कार्यालयाचे नाव :- अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपुर
- ई-निविदा कामाचे स्वरूप :- **शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्याकरीता भाजीपाला पुरवठा करणे**
- पुरवठा करावयाच्या प्रकल्पाचे नाव :- एकात्मिक आदिवासी विकास **प्रकल्प वर्धा जि- वर्धा अधीनस्त** शासकीय आश्रमशाळा- - हिरापुर (तळणी) ता.देवळी **जि- वर्धा**
- सहभागी निविदाधारकाचे नाव :- ------------------------------------------------------------------------------------------------------------

| **वस्तुचा तपशिल** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | परिमाण | दर GST वगळुन इतर सर्व खर्च तथा करांसह- दर हे वार्षिक सरासरी आहेत. | |
| 1 | मेथीची भाजी | प्र./कि. | | |
| 2 | पालक भाजी | प्र./कि. | | |
| 3 | चवळी भाजी | प्र./कि. | | |
| 4 | फुल कोबी | प्र./कि. | | |
| 5 | पत्ता कोबी | प्र./कि. | | |
| 6 | लाल माठ | प्र./कि. | | |
| 7 | आलू/ बटाटे | प्र./कि. | | |
| 8 | कांदे | प्र./कि. | | |
| 9 | बिट | प्र./कि. | | |
| 10 | गाजर | प्र./कि. | | |
| 11 | मुळा | प्र./कि. | | |
| 12 | रताळे | प्र./कि. | | |
| 13 | सुरण | प्र./कि. | | |
| 14 | लसून | प्र./कि. | | |
| 15 | आले | प्र./कि. | | |
| 16 | कोथिंबिर | प्र./कि. | | |
| 17 | हिरवी मिर्चि | प्र./कि. | | |
| 18 | वांगी | प्र./कि. | | |
| 19 | टमाटर | प्र./कि. | | |
| 20 | कोहळा | प्र./कि. | | |
| 21 | लवकी/दुधी भोपळा | प्र./कि. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | दोडके | प्र./कि. | | |
| 23 | तोंडरे | प्र./कि. | | |
| 24 | ढेमशी | प्र./कि. | | |
| 25 | भेंडी | प्र./कि. | | |
| 26 | सिमला मिरची | प्र./कि. | | |
| 27 | कारले | प्र./कि. | | |
| 28 | कच्चा फणस | प्र./कि. | | |
| 29 | मका | प्र./कि. | | |
| 30 | तुर शेंगा | प्र./कि. | | |
| 31 | शेवग्याच्या शेंगा | प्र./कि. | | |
| 32 | चवळीच्या शेंगा | प्र./कि. | | |
| 33 | वाल्याच्या शेंगा | प्र./कि. | | |
| 34 | गवार शेंगा | प्र./कि. | | |
| 35 | फरस बी/घेवडाच्या शेंगा | प्र./कि. | | |
| 36 | काकडी | प्र./कि. | | |
| 37 | कच्ची केळी | प्र./कि. | | |
| 38 | मटार/ वाटाण्याच्या शेंगा | प्र./कि. | | |
| 39 | कच्ची पपई | प्र./कि. | | |
| 40 | पडवळ | प्र./कि. | | |
| 41 | चिंच | प्र./कि. | | |
| 42 | लिंबु | प्र./शेकडा | | |
| **एकुण रक्कम रुपयात** | | | | |

- (सुचना- उपरोक्त मध्ये रकमा नमुद करुन तांत्रिक लिफाफा मध्ये जोडण्यात येउ नये. अन्यथा अपात्र करण्यात येईल.)
- **मागविण्यात येणारे दर हे वार्षिक सरासरी दर आहेत.**
- (सर्व दर हे BOQ मध्येच Upload करण्यात यावे.) सदर दर सन 2026-27 या वर्षासाठी ग्राह्य असुन ई-निविदामध्ये फॉर्म मध्ये सर्व अटी-शर्ती मी वाचल्या असुन मला समजलेल्या आहेत. ई-निविदा फॉर्म मधील नमूद सर्व तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता करून वरील दर मी सर्व करासह स्वतः भरलेले असून ते मला मान्य आहेत.
- ठिकाण: -
- दिनांक:- **निविदाकाराचे नांव, सही व पत्ता:-**

# <u>निविदाधारकाची माहिती</u>

| | | |
|---|---|---|
| **निविदेचे नाव/ तपशिल** | | |
| **निविदा भरलेल्या प्रकल्पाचे नाव** | | |
| **निविदाधारकाचे नाव** | | |
| **निविदाधारकाचा संपुर्ण पत्ता (पिनकोड क्रमांकासह)** | | |
| **दुरध्वनी क्रमांक** | **कार्यालय** | |
| | **कंपनी** | |
| | **मोबाईल क्रमांक** | |
| **संपर्कासाठी ई-मेल आयडी (स्पष्ट व अचूक** | | |
| **ई-निविदा फॅार्म फी रूपये** | | |
| **ई-निविदा बयाणा रक्कम (EMD) रूपये** | | |

ठिकाण: -

दिनांक:- **निविदाकाराची स्वाक्षरी/ शिक्का**

# <u>नमुना क्र. 1</u>

दिनांक:- /05/2026

प्रति,
मा. अपर आयुक्त
आदिवासी विकास नागपुर

विषय-प्रतिनिधी प्राधिकृत करणे बाबत

आदरणीय महोदय,

आम्ही---------------------------------------------------------एक नावाजलेले उत्पादक असुन----------------------------------------वस्तुंचे उत्पादन/ सेवा आमच्या ------------------------------------------------------------या ठिकाणी करीत आहोत. या संदर्भात आम्ही ------------------------------------------------------------ यांना आमच्या कंपनीचे उत्पादीत वस्तुसाठी/ सेवा पुरवण्यासाठी, निविदा प्रकीयेत भाग घेणे, दर ठरविणे, समिती बैठकीस उपस्थित राहणे, निविदा कार्यवाही बाबत निर्णय घेणे या साठी सर्वस्वी अधिकार या विशेष निविदा क्रमांक--------------------- साठी देत आहोत.

आपला / आपली विश्वासु

प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी

(निविदाकाराची स्वाक्षरी / नांव व तपशिल)

**टिप:-** 1. **वरील प्राधिकार पत्र हे निविदाकारा च्या लेटर हेड वर देणे आवश्यक आहे.**
2. **तांत्रिक लिफाफ्यात सदर प्रमाणपत्र Online Upload करावे.**

**(रुपये 500 च्या मुंद्राकावर सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र)**

## नमुना क्र. 2

**प्रति,**

मा. अपर आयुक्त
आदिवासी विकास नागपुर

मी. श्री/ श्रीम.-----------------------------------------प्रोप्रायटर/ अध्यक्ष-------------------------------------------- पूर्ण जाणीवतेने व स्वखुशीने निविदा क्रमांक …………………………………………………………………………………………………………………दिनांक ----/-----/2026 मधील वस्तु पुरविणेबाबतच्या पुरवठाकामी विनाशर्त प्रतिज्ञेवर हमीपत्र लिहून देतो/देते की, निविदा फॉर्म मधील नमूद 01 ते 32 अटी शर्ती ह्या मी स्वतः वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत व सदरच्या अटी व शर्तीचे काटेकारपणे पालन करण्यास मी बांधील आहे. तसेच निविदेत मी/आम्ही सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असून त्यांत कोणतेही फेर-फार केलेली नाही. या निविदा अर्जात नमुद केलेली माहिती माझे संपूर्ण माहितीनुसार खरी आहेत. तसेच निविदेत नमुद केलेले दर हे विना अट आहेत.

वित्तीय अनुपलब्धता अथवा इतर अपरिहार्य कारणामुळे पूरवठा देयकाची रक्कम अदा करण्यास उशिर झाल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही हे मला मान्य असून सदर बाबत मला न्यायालयात दाद मागता येणार नाही. निविदेत नमुद पुरवठा बाबींचा पुरवठा अथवा तद्नुषंगीक व्यावसायीक सेवा पुरवठ्याबाबत शासनाच्या कोणत्याही विभागाने, कार्यालयाने किवा शासनाच्या अंगिकृत महामंडळ, सार्वजनिक उपक्रम व इतर शासकीय संस्था यांच्याद्वारे मला/ आम्हाला सदर निविदा कालावधीकरीता बंदी/मनाई/निलंबन आदेशान्वये काळया यादीत (Black Listed) समाविष्ठ केलेले नाही अथवा माझ्या/ आमच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणी कायदेशीर कारवाई प्रस्तुत नाही तसेच बालमजूरी कामगार कायदे/लैंगिक पिळवणुक/मानवाधिकार इत्यादी विषयी आवश्यक धोरणाचे आमचेकडून सतत पालन होते व यापुढेही पालन होत राहिल.

मी/आम्ही ई-निविदेसाठी ऑनलाईन स्कॅन करुन सादर केलेले कागदपत्र/प्रमाणपत्र / अनुभवाचे दाखले आणि आर्थिक उलाढालीच्या संदर्भात दिलेले सनदी लेखापालाचे (Chartered Accountant) प्रमाणपत्र पूर्णतः खरे व बरोबर आहेत. तसेच त्यातील नोंदविलेली माहिती ही निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर प्राप्त आक्षेप/तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अंती अंशतः अथवा पूर्णतः खोटी तथा निविदा प्रक्रियेतून अपात्र घोषित करण्याकामी संदिगध व अपूर्णता असलेल्या दस्ताऐवजांचा समावेश असल्याचे आढळून आल्यास माझेवर/माझ्या संस्थेवर शासनाचे नियमानुसार उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तसेच माझी बयाणा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल आणि मला/आम्हाला/आदिवासी विकास विभागातील निविदा प्रक्रीये करीता काळया यादीत प्रविष्ठ करण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांकः

ठिकाण :-

**निविदा धारकाची स्वाक्षरी**
**नाव व तपशिल**

**टिप :**

1) **वरील प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुंद्राकावर सादर करणे आवश्यक आहे.**

2) **तांत्रिक लिफाफ्यात सदर प्रतिज्ञापत्र Online Upload करावे.**

## परिशिष्ट- अ

**(निविदाधारक संस्था/ बचत गट असल्यास खालील माहिती परिपुर्ण भरण्यात यावी)**

1) संस्था / बचत गटाचे पूर्ण नांव व संपूर्ण पत्ता ---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------

2) संस्था / बचत गट नोंदणी असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र (संस्था नोंदणी अधिनियम 1950 व 1860) उदा. सहाय्यक निबंधक व बचत गट असल्यास नोंदणी प्रमाणपत्र / जिल्हा प्रामीण विकास यंत्रणा / महिला आर्थिक विकास महामंडळ / नाबार्ड योजनेखाली स्थानिक स्वराज्य संस्था यांचेव्दारा स्थापन झालेले व नोंदणीकृत असेल तर त्या यंत्रणेचे नांव व नोंदणी क्रमांक पुढील प्रमाणे नमूद करण्यात यावे (नांव------------------------------------------
------------------------------------------------------------------------

नोंदणी क्रमांक----------------------------

| अ.क्र | सभासदाचे संपुर्ण नाव | पदनाम | गांव | व्यवसाय | सभासदाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| 8 | | | | | |
| 9 | | | | | |
| 10 | | | | | |

टिप:-

1. उपरोक्त तक्त्यामध्ये संस्था असल्यास संस्थेतील चेअरमन /व्हाईस चेअरमन / सचिवसह सदस्यांची नांवे स्वाक्षरीसह नमूद करण्यात यावी. तसेच बचत गट असल्यास अध्यक्ष/सचिवसह इतर सदस्यांची नांवे स्वाक्षरीसह नमूद करण्यात यावी.
2. व्यवसाय या स्तंभात घरकाम / शिक्षण / निमशासकिय / शासकिय नोकरी वगैरे यापैकी जे असेल तीखरी माहिती नमूद करण्यात यावी.
3. उपरोक्त तक्तामध्ये संस्था चालक / बचत गटातील अध्यक्ष यांनी जर चुकीची माहिती नमूद केल्यास तर सदर संस्था / बचत गटास काळया यादीत टाकण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण :

दिनांक :

**संस्था/ बचत गट**
**(सही/ शिक्का)**

<u>**परिशिष्ट- ब**</u>

**अपर आयुक्त आदिवासी विकास नागपुर यांच्या अंतर्गत**

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प वर्धा जि- वर्धा अधीनस्त शासकीय आश्रमशाळा-** - हिरापुर ता.देवळी **जि- वर्धा**

| Sr No | आश्रम शाळचे नांव | तालुका | जिल्हा | इयत्ता | | विद्यार्थी मंजुर क्षमता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | मुले | मुली | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | हिरापूर | देवळी | वर्धा | १ | १० | २५० | २५० | ५०० |

**स्वाक्षरीत/-**

(------------------)

**अपर आयुक्त**

**आदिवासी विकास नागपुर.**

## परिशिष्ट-6- प्रि-बिड मिटींग मध्ये शंका विचारण्यासाठीचा नमुना

| **Pre-Bid Queries Format** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of the Supplier :-** | | | | | |
| **Department Name :-** | | | | | |
| **Tender Ref No. :-** | | | | | |
| **Tender Name :-** | | | | | |
| **Sr. No** | **REP Page No.** | **RFP Clause No.** | **Clause Title** | **Queries/ Clarification** | **Justification by Bidder** |
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |



Signature Not Verified

Digitally signed by AVINASH DIGAMBARRAO SHINDE
Date: 2026.05.13 18:59:59 IST
Location: Maharashtra-MH